दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.१६ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 16 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 230 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# पोलीस अधीक्षक साहेब; संरक्षण कधी देणार?

## नागरीक त्रस्त, एमएसआरडीसीच्या मागणीला प्रतिसाद नाही

## केज शहर अतिक्रमणाच्या विळख्यात



**बीड । प्रतिनिधी**

केज शहराला अतिक्रमणाचा शाप जणू कायमचाच लागलेला आहे. रस्त्यालगत बेकायदेशीर बांधकामे, टपऱ्या, फळपट्ट्या आणि दुकाने वाढत चालल्याने रस्त्यांची क्षमता कमी झाली असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. यामुळे अपघातांचा धोका वाढतो आहे, तर दुसरीकडे सार्वजनिक विकासकामांनाही खोळंबा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांनी २१ मार्च २०२५ रोजी बीडचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे अतिक्रमण हटविण्यासाठी आवश्यक पोलीस संरक्षण मागितले आहे.

मात्र आज (जुलै) महिनाभराहून अधिक काळ उलटून गेला तरीही पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून कोणताही अधिकृत आदेश वा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे अतिक्रमणविरोधी मोहीम राबवणे अशक्य झाले असून, प्रशासकीय यंत्रणा हातगांठीची बनली आहे.

**अतिक्रमण हटवण्यासाठी केलेल्या मागणीची पार्श्वभूमी**

छत्रपती संभाजीनगर येथील एमएसआरडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांनी २१ मार्च २०२५ रोजी पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे की, केज ते मांजरसुंभा दरम्यानच्या रस्त्यालगत काही स्थानिक नागरिकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केले आहे. यामुळे सार्वजनिक रस्त्यावर वाहतूक विस्कळीत होत असून अपघात होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ अंतर्गत कलम २३ नुसार संबंधित अतिक्रमणधारकांना नोटीस देण्यात आली. मात्र त्यांनी नोटीसमध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत अतिक्रमण हटवलेले नाही.

**अतिक्रमण विरोधात प्रशासनाचे हात बांधलेले?**

प्रशासकीय दृष्टिकोनातून एमएसआरडीसीने स्पष्टपणे नमूद केले आहे की, अतिक्रमण काढताना स्थानिक पातळीवर विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचे संरक्षण अत्यावश्यक आहे. तरी 'आपल्याकडील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या उपलब्धतेनुसार योग्य तारखेला निशुल्क पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे', अशी विनंती कार्यकारी अभियंत्यांनी आपल्या पत्रात केली आहे.

पण आजतागायत पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून कोणताही निर्णय वा कृती झाली नाही, हे विशेष.

**पूर्वीही एकदा अतिक्रमण काढले गेले होते**

मागील वर्षी उपविभागीय पोलीस अधिकारी पंकज कुमावत यांच्या कार्यकाळात त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन केज शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढले होते. त्या वेळी काही काळासाठी रस्ते मोकळे झाले होते. मात्र, काही महिन्यांतच पुन्हा तिथे टपऱ्या, स्टॉल्स, व वाहनतळे उभे राहिले.हेच अतिक्रमण पुन्हा हटवण्यासाठी एमएसआरडीसीने पुढाकार घेतला आहे.

**नागरिकांचे हाल ; विकास कामांना ब्रेक**


अतिक्रमणामुळे रस्त्यांचा रुंदीकरण, दुरुस्ती, वा नवीन प्रकल्प सुरू करणे कठीण झाले आहे. रस्त्यालगत चालणाऱ्या लोकांना व दुचाकीस्वारांना अतिक्रमणामुळे धोका निर्माण होतोय. शासकीय जागांवर अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्यांमुळे खऱ्या गरजवंतांचे नुकसान होत आहे.

**ठोस कारवाईची मागणी**

या साऱ्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिक, वाहनचालक, व स्वयंसेवी संस्था आता एकच प्रश्न विचारत आहेत .

**पोलीस अधीक्षक साहेब, संरक्षण कधी देणार?**

लोकशाहीतील कायद्या-अंतर्गत काम करणाऱ्या शासकीय यंत्रणांना संरक्षण न मिळाल्यास, विकासकामे कशी पार पडणार? असा सवाल नागरिक करत असून तत्काळ पोलीस संरक्षण देऊन अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.शासनाने जर बेकायदेशीर अतिक्रमण काढण्याचा निर्णय घेतला असेल, तर प्रशासनाने पोलिस संरक्षण दिलेच पाहिजे. अन्यथा अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईला कोणताही अर्थ उरत नाही.पोलीस अधीक्षक कार्यालयाने याबाबत त्वरित निर्णय घेऊन एमएसआरडीसीच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशीच अपेक्षा केज शहरवासीय करत आहेत.



जा. क्र. मरारविम / रा.म. ५४८ डी/अतिक्रमण/ 537/२०२५
दि. 21 MAR 2025

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
Maharashtra State Road Development Corpn. Ltd.
(A Government of Maharashtra Undertaking)

प्रति,
मा. पोलीस अधीक्षक
पोलीस अधीक्षक कार्यालय
बीड

विषय:- अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस संरक्षण मिळणे बाबत.

महोदय,

वरिल विषयी विनंती करण्यात येते कि, रा. म. ५४८ डी वर केज ते मांजरसुंभा दरम्यान काही स्थानीक लोकांनी रस्त्याच्या बाजुने शासकीय जागेवर अतिक्रमणे केली आहेत त्यामुळे सदरील रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता आहे. संबंधीत अतिक्रमण धारकांना मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २३ नुसार अतिक्रमण काढुन घेणे बाबत नोटिस बजावली आहे. तथापी संबंधीत अतिक्रमण धारकांनी नोटीसमध्ये नमुद केलेल्या कालावधीत अतिक्रमण काढुन घेतलेले नाहीत.

करिता या कार्यालयामार्फत या कार्यालयाच्या अधिपत्याखालील रस्त्याचे संबंधीत कंत्राटदारामार्फत सदरील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची मोहीम राबवण्यात येणार आहे. अतिक्रमण काढतांना स्थानिक नागरीकांकडुन तीव्र विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने अतिक्रमण काढण्याच्या मोहीमेदरम्यान आपल्याकडील पोलीस अधिकारी / पोलीस कर्मचारी यांच्या उपलब्धतेनुसार सोईची तारीख देऊन आवश्यकतेनुसार निशुल्क पोलीस संरक्षण पुरविण्यात यावे ही विनंती.

कार्यकारी अभियंता
म.रा.र.वि.म. (मर्या.),
शिबीर कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रत:-
१. मा. जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा मा. जिल्हाधिकारी बीड यांना माहितीस्तव सादर.
२. अधीक्षक अभियंता, मरारविम छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव सादर.
३. तहसिलदार, बीड यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव सादर.
४. पोलीस निरिक्षक पोलीस ठाणे केज / नेकनुर ता. केज जि. बीड यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.
५. उप अभियंता, मरारविम छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव योग्य कार्यवाहीस्तव.
६. प्रोजेक्ट मॅनेजर मे. पटेल-पवार-हर्ष (जे. व्ही.) यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.

Camp Office:afT-18, Shree-Dnyan Comp Tecno Park, Opp. Garware Stadium, MIDC Chikalthana, Ch. Sambhajinagar- 431 003
शिबीरकार्यालय: T-१८, ज्ञानपीठकॉम्पटेक्नोपार्क, गरवारेस्टेडियमसमोर, एमआयडीसीचिकलठाणा, छत्रपतीसंभाजीनगर- ४३१ ००३
Telephone No. Cum Tele Fax 0240/ 2980054E-mail- seaurangabad@msrdc.in / cemsrdc@gmail.com
Corporate Office:Opp. Bandra Reclamation Bus Depot, Near Lilawati Hospital, K C Marg, Bandra (West) Mumbai-400 050
Telephone No: 022-26400190/201, 26558175/ 76 Fax No.: 022-26417893CIN:U45200MH1996SG101586

# केज तालुक्यात ११४ ग्रामपंचायतीचे सरपंच पदासाठी २०२५-२०३० आरक्षण जाहीर!

## महिलांना व सर्व घटकांना न्याय देणारी आरक्षण सोडत घोषित

**केज । प्रतिनिधी**

ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी सन २०२५ - २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी आरक्षणाची सोडत दिनांक १५ जुलै २०२५ रोजी केज तहसील कार्यालयात जाहीर करण्यात आली.या आरक्षण सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांना विशेष संधी देण्यात आली आहे.





या आरक्षण प्रक्रियेच्या माध्यमातून एकूण ग्रामपंचायतींपैकी प्रत्येक प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणाचे गावनिहाय वितरण पुढीलप्रमाणे आहे. अनुसूचित जाती (एस. सी)महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती मांगवडगाव,इस्थळ, मोटेगाव,साळेगाव, हनुमंत पिंप्री, मस्साजोग,लाखा, बोरीसावरगाव,सादोळा सर्वसाधारण (एस. सी.खुला) प्रवर्गासाठी:सारुळ, कोल्हेवाडी,धनेगाव, सौंदना,उंदरी, वरपगाव/कापरेवाडी, जवळबन,सोनिजवळा, लव्हूरी अनुसूचित जमाती (एस. टी)महिलांसाठी आरक्षित:ढाकेफळ सर्वसाधारण प्रवर्गासाठी: धोतरा नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओ.बी.सी) महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती :जोला, मुलेगाव,पिसेगाव, पिटीघाट, शेलगाव गांजी,सातेफळ, लिंबाचीवाडी,केकान वाडी, सोनेसांगवी, येवता,रामेश्वरवाडी/ ढाकनवाडी,कौडगाव, पाथरा,सावळेश्वर, बोबडेवाडी, नांदुरघाट नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण प्रवर्गासाठी (ओ.बी.सी) :आरणगाव,भाटुंबा, भोपला,दरडवाडी, डोका, काशीदवाडी, शिंदी, चिंचोलीमाळी, नाव्होली, लाडेवडगाव, पैठण,दहिफळ (वड), माळेगाव,बावची सर्वसाधारण प्रवर्ग (ओपन) महिलांसाठी आरक्षित ग्रामपंचायती :लाडेगाव, कानडी माळी,कोठी, बोरगाव बुद्रुक,तरनळी, काळेगाव घाट, बनसारोळा,भालगाव, विडा/गौरवाडी,कासारी, आवसगाव/ वाकडी, पिंपळगव्हाण,हदगाव, माळेवाडी,दिपेवडगाव, कानडीबदन,कुंभेफळ, सुकळी,वाघेबाभळगाव,बानेगाव,नागझरी, सासुरा,डोनगाव, मुंडेवाडी,पिराचीवाडी, दैठणा,केकत सारणी, कोरेगाव,पळसखेडा, शिरपुरा,उमरी खुल्या ( ओपन) प्रवर्गासाठी:गोटेगाव, जाधव जवळा,साबला, युसुफ वडगाव,होळ, बनकरंजा, एकुरका, तांबवा,आनंदगाव, केवड,सारणी आनंदगाव, सूर्डी,शिरूर घाट/ गदळेवाडी, औरंगपूर,चंदन सावरगाव, केळगाव/बेलगाव,जानेगाव, धर्माळा,देवगाव, कोरडेवाडी, आनेगाव, राजेगाव,टाकळी, सांगवी (आ), आंधळेवाडी, जिवाची वाडी/तुकुचीवाडी, घाटेवाडी,नारेवाडी, आडस, सारणी (आ), नायगाव इत्यादी ग्रामपंचायती असून आरक्षणाची ही प्रक्रिया शासनाच्या निर्देशानुसार पारदर्शक आणि संगणकीय प्रणालीद्वारे सोडतीच्या माध्यमातून पार पडली.ग्रामीण भागातील महिलांना नेतृत्व संधी देणारे हे आरक्षण भविष्यातील ग्रामविकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

# शिवसेना पक्ष, धनुष्यबाण कुणाचा? ३ महिन्यांत निकाल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–सर्वोच्च न्यायालयात आज शिवसेनेच्या वादावर सुनावणी झाली. त्यात सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण पुढील ३ महिन्यांत निकाली काढण्याचे स्पष्ट संकेत दिले. त्यामुळे शिवसेना हे नाव व धनुष्यबण हे निवडणूक चिन्ह कुणाचे? यावर ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात फैसला येण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, सुप्रीम कोर्टात जून २०२२ पासून शिवसेनेचा वाद प्रलंबित आहे. यावरील सुनावणी वारंवार पुढे ढकलण्यात येत असल्यामुळे मोठी नाराजी व्यक्त केली जात आहे.शिवसेनेत २०२२ मध्ये मोठी बंडखोरी झाली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील गटाला शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह दिले होते. निवडणूक आयोगाच्या या आदेशांना उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले होते. त्यांच्या या याचिकेवर आज सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. त्यात खंडपीठाने हे प्रकरण ऑगस्टमध्ये सुनावणीसाठी घेण्याचे संकेत दिले. तत्पूर्वी ठाकरे गटाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असल्यामुळे या प्रकरणी आजच सुनावणी घ्या असा आग्रह धरला. पण कोर्टाने आज प्रकरण ऐकण्यास स्पष्ट नकार दिला. या प्रकरणी पुढील महिन्यात एखादी जवळची तारीख दिली जाईल, असे कोर्ट म्हणाले. त्यानंतर सायंकाळी कोर्टाने या प्रकरणी पुढील सुनावणीसाठी २० ऑगस्ट ही तारीख निश्चित केली.वकील सिद्धार्थ शिंदे पुढे बोलताना म्हणाले, आज सुप्रीम कोर्टाने केलेले विधान हे उद्धव ठाकरे यांना मोठा दिलासा मिळाला असेच म्हणावे लागेल. कारण, मागील २ वर्षांपासून जी अनिश्चितता होती ती आता सुप्रीम कोर्टानेच दूर केली आहे. कोर्टाने स्वतःच या प्रकरणी ऑगस्ट महिन्यातील तारीख देण्याची घोषणा केली आहे. त्यात एक-दोन दिवस सुनावणी चालेल, सुनावणी तहकूब होईल. पण चालू वर्षाच्या आत हे प्रकरण निकाली निघेल हे नक्की.या मधल्या काळात निवडणुका लागल्या तर सध्या आहे तीच परिस्थिती राहील. पण ऑगस्ट किंवा त्यापुढील दोन महिन्यांत निकाल आला तर स्थिती स्पष्ट होईल. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचा प्रयत्न हे प्रकरण ऑगस्ट महिन्यातच निकाली निघेल असा राहील, असे शिंदे यांनी सांगितले.शिंदे गटाच्या वकिलांनी यावेळी ठाकरे यांच्या याचिकेला कडाडून विरोध केला. याचिकाकर्त्यांनी ही याचिका आत्ताच का दाखल केली? ते मागील २ वर्षांपासून झोपा काढत होते का? असा प्रश्न उपस्थित केला. पण कोर्टाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. आतापर्यंत जे झाले ते झाले. आता २ वर्ष संपलेत. आम्हाला याचा सोक्षमोक्ष करावाच लागेल, असे कोर्ट म्हणाले. त्यामुळे या प्रकरणाचा निकाल पुढील ३ महिन्यांत अपेक्षित आहे, असे सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितले.

# जनविकास महाविद्यालयात विद्यार्थी संसद शपथविधी सोहळा संपन्न

**केज । प्रतिनिधी**

बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात महाराष्ट्र शासन अंतर्गत सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थी संसद शपथविधी सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्राचार्य पाठक सर व मुकुंदराज महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्रा. गवारे मॅडम तसेच करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ. राजेश गायकवाड उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सुरू असणाऱ्या विविध





उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी व अधिकार पदाच्या जागा प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा करिअर कट्टा हा उपक्रम फायदेशीर ठरणार आहे असे मत व्यक्त केले. यावेळी प्रमुख प्राचार्य पाठक सर व प्रा. गवारे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व करियर कट्टा उपक्रमाचा लाभ घेण्यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा डॉ. राजेश गायकवाड यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नंदकिशोर यांनी सूत्रसंचालन केले, प्रस्ताविक प्रा. डॉ. राजेश गायकवाड यांनी केले तर प्रा. डॉ. केशव तिडके सर यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी संसदेतील प्रतिनिधी चि. गोरे राज, चि.गोरे अभिषेक, कु. करपे प्रतीक्षा, चि.सचिन गायकवाड, चिरंजीव ओमकार भाकरे, कु. करपे आकांक्षा व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ११२ ही सेवा नावापुरतीच नागरिकांची सुरक्षा वाऱ्यावर

**श्रीगोंदा । सोनाली गाडेकर**

सध्या ११२ ही सेवा नावापुरतीच असून याचा फायदा नक्की कोणासाठी हे अद्यापही संशोधणाचा विषय आहे.

सविस्तर वृत्त असे कि राज्यात पोलीस मदतीसाठी ११२ हा क्रमांक प्रसिद्ध असून या मध्ये खरच नागरिकांना मदत पुरवली जात नसल्याचे चित्र दिसून येते कित्येक नागरिकांनी पोलीस मदतीसाठी कॉल केला असता मदत मिळत नसल्याचे दिसून येत आहे याचे अलीकडंचेच उधाहरण घेतले असता बेलवडी पोलीस हद्दीत असलेले कोळगाव बिट यामध्ये वारंवार चोरी, अवेध्य धंदे यासह अनेक प्रकार घडत असतात परंतु पोलिसांचे याकडे सोईस्कर दुर्लक्ष होताना दिसून येत आहे गावात अनेक वाहने बेवारस सोडली जातात नंतर ती गायब ही होतात पोलिसांना याची कल्पना देऊनही पोलीस कसलीही तपासणी करताना दिसून येत नाहीत नक्की पोलीस आहेत तरी कशा साठी हा संशोधणाचा विषय असून याचा शोध तरी कसा व कधी लागेल हे देवच जाणे ११२ हा पोलीस मदत नंबर असून यासाठी काही दिवसापूर्वी २ अज्ञात गाड्या चार ते पाच दिवस बेवारस दिसून आल्या होत्या यासाठी ११२ या क्रमांकावर फोन करूनही पोलीस यांनी त्या गाड्यांची तपासणी केली नाही व त्या ठिकाणी भेट धिली नाही यानंतर त्या गाड्या गायबही झाल्या तरीही पोलिसांनी डोकूनही पाहिले नाही सरास होणाऱ्या चोऱ्या, रस्त्याने अडवणूक करून लूट करणाऱ्या टोळ्या अश्या एक नं अनेक प्रश्न नागरिकांपुढे उपस्थित असताना पोलीस न्नकी करतात तरी काय या कडे नागरिकांनी लक्ष ठेवले असता पोलीस फक्त ठराविक व्यवसायकांकडे भेटी गाठी घेत असल्याचे दिसून आले आहे याची तक्रार नागरिक वरिष्ठ पातळीवर करणार असल्याचे समजत आहे.

# राशन माफियाच्या घरातूनच पुरवठा विभागाचा पंचनामा; होळ येथील धक्कादायक प्रकार

## पुरवठा विभाग 'मॅनेज' असल्याचा ग्रामस्थांचा आरोप

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथील उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या राशन दुकानातून काळया बाजारात जात असलेले ४४ क्विंटल स्वस्त धान्य धारूर पोलिसांनी पकडले. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या आदेशा नंतर खडबडून जागे झालेल्या केजच्या पुरवठा विभागाच्या तपासणी पथकाने चक्क राशनमाफियाच्या घरात बसूनच पंचनामा केल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे.या प्रकारामुळे कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

होळ येथील स्वस्त धान्याचा काळाबाजार धारूरमध्ये उघडकीस आला.उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्थे अंतर्गत त्यांचा भाऊ अशोक तुकाराम घुगे हा राशन दुकान चालवतो. त्याने राशनचे धान्य काळ्या बाजारात विक्री साठी पाठवल्याची कबुली वाहन चालकाने दिली.तसा धारूर पोलिसांनी पुरवठा विभागाला अहवाल दिला आहे.या पार्श्वभूमी वर राशन दुकानाची केजच्या तालुका पुरवठा विभागाकडून तपासणी करण्यात आली.या पथकात






तालुकापुरवठा निरीक्षण अधिकारी सुजाता मेश्राम,श्रीमती उंबरे, मंडळ अधिकारी संतोष देशमुख,तलाठी नामदेव उगले यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. मात्र पंचनामा करण्या साठी संबंधित दुकानात न जाता,त्यांनी थेट राशन माफियाच्या घरातच बसून पंचनामा सुरू केला.ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी केज तहसीलदारांना कळवले तहसीलदारांनी त्वरित हस्तक्षेप करत पथका तील अधिकाऱ्यांना खडसावले.त्यानंतर दुकानात बसूनपंचनामा पूर्ण करण्यात आला. या संपूर्ण प्रकारामुळे होळ येथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गोंधळ पुन्हा एकदा उघड झाला असून, जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करावी,अशी मागणी होत आहे.

राशन दुकानदाराच्या घरात बसून पंचनामा केला जात असल्याचा आरोप होता.त्या अनुषंगाने तहसील दारांना कळविले आहे. योग्य ती कार्यवाही केली जाईल.
शिवकुमार स्वामी, प्र.जिल्हा पुरवठा अधिकारी,बीड

### माफियांच्या समोर खरे जवाब आलेच नाहीत!

**पंचनाम्यासाठी राशन माफियाच्या नातेवाईकांसह काही नागरिकांना घरासमोर बोलावून त्यांच्या जबाब नोंदवण्यात आले.एकूण २३ जणांचे जबाब घेण्यात आले असलेतरी दबावाच्या वातावरणा मुळे अनेकांना खरी माहिती देता आली नाही,अशी चर्चा ग्रामस्थांत सुरू आहे. त्यामुळे तहसीलदारांनी तहसीलमध्ये जवाब घ्यावेत अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जाणार आहे.**

माझ्याकडे राशन दुकानदाराच्या घराचा व्हिडिओ आला.त्या नंतर अधिकाऱ्यांना तात्काळ दुकानातूनच पंचनामा करण्याच्या सूचना केल्या.पारदर्शक पद्धतीने चौकशी करू.
–राकेश गिड्डे, तहसीलदार,केज

## संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्या वरील जीवघेण्या हल्ल्याचा निषेध



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अक्कलकोट, जिल्हा सोलापुर येथे काही समाजकटकानी केलेल्या भ्याड व जीवघेणा हल्याचा निषेध करण्यासाठी शिवप्रेमी व सर्व सामाजिक संघटना तालुका देगलूर जि.नांदेड च्या वतीने उप जिल्हाधिकारी कार्यालय देगलूर यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.महाराष्ट्रातील गावोगावी जाऊन फुले शाहू आंबेडकरांचा विचार युवकांमध्ये पेरणारे, बहुजन समाजातील शेकडो पोरांना उद्योजक बनविणारे प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोटमध्ये भ्याड हल्ला झाला. रविवारी दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास काही तरुणांनी गायकवाड यांच्यावर शाईफेक करून त्यांच्याशी असभ्य वर्तन केले. सामाजिक वर्तुळातून घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त होत असताना पुरोगामी चळवळीतील नेते, युवकांच्या मन आणि मेंदूच्या मशागतीसाठी राज्यभर फिरून व्याख्याने देणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळे फासले. अक्कलकोटमध्ये सत्काराच्या कार्यक्रमाला गेलेले असताना त्यांच्यावर शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी हल्ला चढवला. गायकवाड यांची गाडी देखील फोडण्यात आली तसेच त्यांच्या अंगावरील कपडे फाडण्याचा प्रयत्न शिवभक्त म्हणवल्या जाणाऱ्या कार्यकर्त्यांनी केला. बहुजन समाजात अनेक उद्योगपती घडवणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शाईफेक करणाऱ्या विकृतीचा जाहीर निषेध. शिव–फुले–शाहू–आंबेडकर यांचा विचार समाजात रुजवण्याचं खूप मोठं कार्य प्रविणदादा गायकवाड यांच्या हातून होत आहे. अभ्यासाच्या बळावर त्यांनी अनेकांना उघडं पाडण्याचं काम केलं. म्हणून तर समाजकंटकांनी त्यांच्याशी अशा प्रकारे गैरकृत्य केलं नाही ना? याचाही तपास झाला पाहिजे. तसंच हे कृत्य करणारी व्यक्ती कोणत्या पक्षाशी आणि विचारांशी संबंधित आहे हे उघड आहे. त्यामुळे या भ्याड कृत्यामागील मास्टरमाईंडचाही पोलिसांनी शोध घ्यावा. आम्ही सर्वजण प्रविणदादा गायकवाड यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहोत, असे सर्व सामाजिक संघटना व शिवप्रेमी तालुका देगलूर जि.नांदेड च्या वतीने उप जिल्हाधिकारी कार्यालय देगलूर यांना निवेदन मार्फत देण्यात आला.यावेळी देगलूर तालुक्यातील अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी यांना महाविकास आघाडीच्या वतीने निवेदन

## प्रभाग रचना मध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप करू नये–निलेश लंके

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

१० जून २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार, ड वर्ग महानगरपालिकांमध्ये चार सदस्यीय प्रभाग प्रणाली लागू करण्यात आली आहे. सदर आदेश महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने जारी करण्यात आला असून, त्यानुसार प्रभाग रचना करताना २०११ च्या जनगणनेचा, भौगोलिक सलगतेचा व लोकसंख्येतील समतोल यांचा अवश्य विचार करावा अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने आज खासदार निलेश लंके यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड, नगरसेवक योगीराज गाडे, माजी महापौर दीप चव्हाण, नलिनी गायकवाड आदीसह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



पुढे निवेदनात म्हटले आहे की, याच अनुषंगाने नागरिकांमध्ये, २०१८ साली तत्कालीन नगर महानगरपालिकेसाठी करण्यात आलेली प्रभाग रचना न्याय्य व कायदेशीर असल्यामुळे तीच रचना पुन्हा कायम ठेवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. २०१८ मध्येही ही रचना शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सुसंगत पद्धतीने करण्यात आली होती. सरासरी लोकसंख्येतील १०% चा मर्यादित फरक राखण्यात आला होता तसेच कोणत्याही प्रगणक गटाची फोड करण्यात आली नव्हती. नागरिकांचा ठाम आग्रह आहे की, नव्याने प्रभाग रचना करताना कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये.प्रभाग रचना ही पक्षपातीपणाऐवजी पारदर्शक, कायदेशीर व निःपक्षपाती पद्धतीने व्हावी, अशी जनतेची स्पष्ट भूमिका आहे. शासनाच्या आदेशातदेखील हीच भूमिका अधोरेखित करण्यात आली असून, त्या निर्देशांचे तंतोतंत पालन न केल्यास निवडणूक प्रक्रिया अडचणीत येऊ शकते व संबंधित प्रशासनावर शिस्तभंगात्मक कारवाईची शक्यता देखील निर्माण होऊ शकते. व विशेष म्हणजे, २०१८ मध्ये केलेली रचना आजही भौगोलिक, सामाजिक आणि लोकसंख्या समतोलाच्या निकषांवर परिपूर्ण आहे. त्यामुळे, त्याच रचनेत बदल करण्याची गरज नसून, कोणतेही पक्षपाती फेरबदल केल्यास ते कायद्याच्या चौकटीत बसणार नाहीत, असा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे. संपूर्ण प्रभाग रचना प्रक्रिया ही राज्य शासन व निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसारच पार पाडली जावी, अशी लोकशाहीविषयक अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# सामाजिक न्याय विभागात १५०० कोटींचा टेंडर घोटाळा: आरटीआय कार्यकर्त्याचा दावा

## कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांचा पाय आणखी खोलात

**मुंबई (वृत्तसंस्था)**

कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांच्या नेतृत्वातील सामाजिक न्याय खात्यात तब्बल १५०० कोटींचा टेंडर घोटाळा झाल्याचा आरोप आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून हे टेंडर रद्द करण्याची मागणी केली आहे. या आरोपामुळे अगोदरच व्हिडिओ कांडामुळे अडचणीत सापडलेल्या संजय शिरसाट यांचा पाय आणखी खोलात गेल्याची चर्चा आहे.राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचाही एक व्हिडिओ गत आठवड्यात व्हायरल झाला होता. त्यात ते आपल्या खोलीत कॉटवर सिगारेट ओढत बसल्याचे दिसून येत आहेत. यावेळी त्यांच्या अंगावर बनियन व चड्डीच होती. तसेच त्यांच्या शेजारी एक पैशांचे बंडल असणारी बॅगही पडलेली होती. त्यांचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने हा पैसा त्यांना मिळालेल्या ५० खोक्यांपैकी १ खोका असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी आरोप – प्रत्यारोपाच्या फैरी झडत असताना आता शिरसाट यांच्या सामाजिक न्याय विभागात १५०० कोटींचा टेंडर घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार या कथित घोटाळ्याचा तपशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देत म्हणाले की, मुख्यमंत्री साहेब, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आधीच अनेक गंभीर आरोप आहेत. आता टेंडर क्र. ३७४ द्वारे सामाजिक न्याय विभागाने काढलेल्या १,५०० कोटींच्या टेंडरमध्ये मोठा घोटाळा उघड झाला आहे. या टेंडरमध्ये अनियमितता आहे. या टेंडरसाठी स्मार्ट सर्व्हिसेस (पूर्वीची ब्रिस्क इंडिया), बीव्हीजी इंडिया आणि क्रीस्टल इंटीग्रेटेड सर्व्हिसेस फक्त याच तीन कंपन्या पात्र ठरल्या आहेत. या तिन्ही कंपन्यांनी १९.५० टक्के इतकाच सर्व्हिस चार्ज दिला आहे,



म्हणजे स्पष्ट रिंग (उेश्रश्रीळेप) आहे. हे बेकायदेशीर असून पूर्वी ब्रिस्क इंडियाला ब्लॅकलिस्ट करा असे पत्र आपणच दिले होते.या कंपनीवर ईडीची कारवाई सुरु आहे. या टेंडरमध्ये एकूण खर्चाचा उल्लेख नाही. यामध्ये सहा वर्षांसाठी ३,६३४ कामगार दाखवण्यात आले आहेत, पण कोणत्या पदासाठी किती वेतन दिले हेच दिलेले नाही. केवळ सर्व्हिस चार्जच्या आधारावर हजारो कोटी रुपयांचा निर्णय घेण्यात आला आहे. १३ वर्षे (२०१३) झाले हेच ठेकेदार आहेत, याचा एक पॅटर्न तयार झाला आहे. गेल्या १० वर्षात कोणतेही नवीन टेंडर न काढता काम सुरू आहे. यात एकाच टेंडरवर १,५०० कोटींचे पेमेंट झाले आहे.

विजय कुंभार यांनी हा घोटाळा असल्याचा दावा करताना याची चौकशी करण्यासह इतरही काही मागण्या केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, हे १५०० कोटींचे टेंडर तात्काळ रद्द करण्यात यावे. रिंग करणाऱ्या कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. जिल्हानिहाय टेंडर प्रणाली लागू करुन त्यात स्थानिक महिला गट, युवक, संस्थांना संधी मिळावी. मागील १३ वर्षांचा गैरव्यवहार आणि विना–टेंडर काम याची देखील चौकशी करण्यात यावी. ही बाब सामाजिक न्याय विभागातील पारदर्शकतेचा आणि सार्वजनिक निधी वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. कृपया मुख्यमंत्र्यांनी या घोटाळ्याकडे त्वरित लक्ष द्यावे आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.उल्लेखनीय बाब म्हणजे छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल व्हिट्स खरेदीच्या टेंडर गैरव्यवहारात संजय शिरसाट अडकले आहेत. त्यानंतर त्यांचा पैशाने भरलेल्या बॅगेसह व्हिडिओ व्हायरल झाला होता. आता नव्या मोठ्या टेंडर घोटाळ्यात त्यांच्या खात्याचे नाव आल्यामुळे त्यांचा पाय खोलात गेल्याचा दावा केला जात आहे.


# देवगिरी प्रतिष्ठानतर्फे डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

## राज्यभरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-मुख्य संयोजक प्रा.प्रदीप रोडे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठाण, बीड यांच्या वतीने साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले असून, यंदाचे हे १६ वे वर्ष आहे. ही स्पर्धा रविवार, ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड येथे भव्य स्वरूपात पार पडणार आहे. या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत शालेय इ.८वी ते १२वी कनिष्ठ आणि महाविद्यालयीन पदवी व पदव्युत्तर वरिष्ठ असे दोन गट असतील. वरिष्ठ गटासाठी विषय संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे मार्गदर्शन व योगदान, अण्णाभाऊ साठे यांची आंबेडकर वादाबाबत भूमिका आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद हे असून कनिष्ठ गटासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मानवी कल्याणाचे मार्गदर्शक आहे काय?, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील नायक-नायिका समता- स्वातंत्र्य-बंधुत्व न्यायासाठी लढतात काय? आणि नैतिक मूल्यांचे संवर्धन फकीरा या कादंबरीतून अण्णाभाऊंनी दर्शविले आहे हे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

प्रत्येक स्पर्धकास ५ ते ७ मिनिटांचा वेळ दिला जाणार असून, भाषाशैली, विषयाची सखोलता, प्रभावी मांडणी आणि सादरीकरण या निकषांवर मूल्यांकन करण्यात येणार आहे. शालेय गटासाठी प्रवेश शुल्क ५०/- आणि महाविद्यालयीन गटासाठी १००/- निश्चित करण्यात आले आहे. सहभागी स्पर्धक आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या शिक्षकांसाठी भोजनाची विनामूल्य व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे.या स्पर्धेसाठी वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटांमध्ये पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक १०,०००, द्वितीय ७,०००, तृतीय ५,००० तर तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० आणि सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक ७,०००, द्वितीय ५,०००, तृतीय ३,००० आणि तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी आपली नोंदणी १ ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज स्कॅन करून ऑनलाइन फॉर्मद्वारे नोंदणी करता येईल. बीड, धाराशीव, नांदेड, परभणी, संभाजीनगर, लातूर आदी जिल्ह्यांतील शिक्षक समन्वयकांमार्फतही ही नोंदणी प्रक्रिया पार पडणार आहे. राज्यातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आणि स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ७०३०००८५६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.



# कानेश्वर विद्यालय कानडी माळी येथेल १९९९ च्या बॅचचे स्नेहमिलन उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

वर्षा मागून वर्ष सरत जातात शिक्षण करियर लग्न नोकरी या साऱ्या धकाधकीच्या जीवनात शाळा कॉलेजमधले वर्गमित्र मैत्रिणी ही अक्षरशः विखुरले जातात कित्येक वर्ष तर भेटही होत नाही फोन तर दूर.. कुठे असेल आता तो.. कुठे असेल आता ती.. हा प्रश्न सतत मनाला छळत असतो मात्र काळजा मधून आठवणी पुसत नाहीत.. आणि मग सोशल मीडियावर शोध सुरू होतो. त्या सर्व बालदोस्तांचा आणि भरतो कार्यक्रम गेट-टुगेदर चा...

शाळेतल्या त्या मस्त आठवणी सरांच रागावणं, चिडणं, मारणं, चोरून डबा खाणं आठवतं आणि आठवतात एकमेकांना चिडवायच्या कितीतरी गोष्टी आणि मग उजाडतो तो गेट-टुगेदर चा दिवस आणि सुरू होते मौज मजा आणि आठवणींची हिरवळ कार्यक्रमाची.. आनंदाचे क्षण पुन्हा जगूया जुन्या आठवणींना जावूया शाळेच्या अंगणात फुलवलेली ती मौजमजा आज पुन्हा अनुभवूया चला मित्रांच्या गलक्यात हरवून जाऊया.. आजचा हा गेट-टुगेदर चा दिवस प्रत्येकासाठी खासच असतो कारण सगळेजण तर भेटणार असतात पण वर्गातल्या बेंचवर जगलेल्या आठवणी सुद्धा भेटणार असतात.



मांगल्याचा नवचैतन्याचा आणि केलेल्या आठवणी सुद्धा हा नवचैतन्याचा आणि हर्षाचा प्रकाश आनंद घेऊन आला आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष गरडे सर मुख्याध्यापक कानेश्वर विद्यालय कानडीमाळी यांची उपस्थिती होती तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक गवळी सर, गीते सर, खाडे सर,गिरी सर , मुख्याध्यापक, जि .प .उच्च प्राथमिक शाळा , कानडी माळी . श्रीमती शेळके मॅडम व आदर्श शिक्षक नरहरी काकडे सर उपस्थित होते. यावेळी मुलांनी शाळेतील त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच त्यांच्या जीवनातील शिक्षकांचा योगदान याबद्दल मनोगतही व्यक्त केले यावेळी सुधीर नाईकनवरे, सुनील राऊत, अनुराधा शिंदे, वंदना शिंदे, महादेव मस्के, विनोद राऊत, जालिंदर राऊत, मनोज काळे, माधव वाघमारे, सोनाजी काकडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या गुरुजनांच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री नरहरी काकडे सर यांची खूप मदत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर नाईकनवरे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री काकडे सर यांनी केले.

# मुकबधीर विद्यार्थ्यांनी लुटला सितारे जमीनपर चित्रपटाचा आनंद

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने विशेष म्हणजेच मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी सितारे जमीनपर हा हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी चित्रपट कोहिनूर मॉलच्या चित्रपटगृहात दाखविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन सेवाप्रीत फाउंडेशनच्या महिला सदस्यांनी केले होते.



वडगाव गुप्ता रोड, सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मुकबधीर विद्यालय व वस्तीगृहातील ५० विद्यार्थी आणि शिक्षकांनी या चित्रपटाचा आनंद घेतला. चित्रपटाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास, आशावाद आणि काहीतरी वेगळं करून दाखवण्याची उमेद जागविण्यात आली. चित्रपटादरम्यान मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. यावेळी सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख निशा धुप्पड, अर्चना खंडेलवाल, अन्नू थापर, गीता नय्यर, गीता माळवदे, बबीता जग्गी, नताशा धुप्पड, गीता धुप्पड, अर्चना ओबेरॉय, रिटा बक्षी, विना खुराणा, डॉ. सोनाली वहाडणे, बब्बू धुप्पड, संगीत बट, मुकबधीर विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप जगधने आदींसह महिला सदस्या व विद्यार्थी उपस्थित होते. विशेष मुलांना एक प्रेरणादायी अनुभव देण्यासाठी सर्व महिला सदस्यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून योगदान दिले. जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, देवाने प्रत्येकाला काही कमी-जास्त गुण दिले आहेत. कोणीही परिपूर्ण नसतो. पालक व शिक्षक विद्यार्थ्यांतील चांगले गुण ओळखून त्यांना योग्य दिशा दिल्यास ते जीवनात नक्कीच यशस्वी होतात. विशेष मुलांमध्येही अनेक अद्वितीय क्षमता असतात. त्या क्षमतांना प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमात विशेष मुलांना शिकवणाऱ्या आणि त्यांच्यासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या शिक्षकांचा सेवाप्रीत फाउंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला. विशेष मुलांचे संगोपन व शिक्षण हे मोठ्या समर्पणाचे कार्य असून, या मुलांसाठी झटणाऱ्या पालकांच्या जिद्दीला सेवाप्रीतच्या वतीने सलाम करण्यात आले. या उपक्रमास श्वेता गांधी यांचे सहकार्य लाभले. सेवाप्रीतच्या वतीने वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना जेवणासाठी स्टीलच्या ताटांची भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांना चित्रपटाची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल मुकबधीर विद्यालय व वस्तीगृहाच्या वतीने सेवाप्रीत सोशल फाउंडेशनचे आभार मानण्यात आले.

### नांदेड गवळी समाजातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांच्या गौरव समारोहास

# पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन

**नायगांव । हनुमंत चंदनकर**

नांदेड येथे गवली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यासाठी प्रज्ञा जागृती मिशन वतीने सोमवार, २८ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता मारवाडी धर्मशाळा, साथी बालाराम यादव नगर, वझीराबाद नांदेड येथे गौरव समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात नांदेड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक मा. अबिनाश कुमार सर मुख्य मार्गदर्शक अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या प्रेरणादायी विचारांचा विद्यार्थ्यांना आणि समाजाला मोठा लाभ होणार आहे. अबिनाश कुमार हे उत्कृष्ट प्रशासनिक अधिकारी असून त्यांनी पोलिस विभागात कार्यरत असून सामाजिक सहकार्य, शिस्त आणि सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम ते नियमितपणे राबवीत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली नांदेड पोलिसांनी स्थानिक सामाजिक समस्यांवर प्रभावी उपाययोजना केल्या असून, त्यांचा अनुभव व मार्गदर्शन नवीन पिढी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



या समारंभात शिक्षण, क्रीडा, कला, संस्कृती तसेच इतर क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे नव्या पिढीला प्रोत्साहन देऊन सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रज्ञा जागृती मिशनचे कार्यकर्ते एकजुटीने मेहनत घेत असून, गोकुल यादव, डॉ. संतोष मंडले, बिरबल यादव, सुशांत यादव, ॲड. ऋषी यादव, अमोल चौधरी, गौरव यादव, योगेश रौत्रे, दिनेश रौत्रे, महेश यादव, गोविंद मंडले, राजेश गवळी, ईश्वर यादव, दर्शन फतेलष्करी, मयूर परीवाले, सुनील लुले, भावेश यादव यांचा विशेष सहभाग आहे. तसेच यादव महासभेचे बिशनकुमार शामलाल यादव, नरसिंग गुम्मनलाल मंडले, राधाकिशन लक्ष्मणजी यादव, गजानन भानुदास यादव (न्यायाधीश, गंगाखेड), तुलजेश गणेशलाल यादव, किशोर किशनलाल यादव, धीरज ईश्वरलाल यादव (सर्व माजी नगरसेवक, नांदेड म.न.पा.), गणेशलाल किशनलाल भातावाले, गोपाल घनश्याम फत्तेलष्करी, भारत शामलाल यादव, सुंदरलाल प्रभुलाल भातावाले, विनय बाबूलाल यादव आणि स्वराज संजय यादव यांचा कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन आहे.

प्रज्ञा जागृती मिशनचे सचिव गगन लालामन यादव व कार्यक्रम संचालक डॉ. (प्रा.) कैलाश भानुदास यादव यांनी समाजातील सर्व बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुणवंत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवावे आणि त्यांच्या यशाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले आहे.

### शाही फेकीच्या घटनेचा बार्शीत निषेध

# संभाजी ब्रिगेड जशास तसे उत्तर देईल-आनंद काशीद

## प्रवीण गायकवाड यांच्यावर शाही फेक प्रकरणावरून बार्शीत संतप्त प्रतिक्रिया

**बार्शी (प्रतिनिधी)**

संभाजी ब्रिगेडचे नेते प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे कार्यक्रमादरम्यान दिपक काटे यांनी शाही फेक केली. या प्रकाराचा बार्शी तालुक्यातील संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध करत दिनांक १४ जुलै रोजी तहसील कार्यालयासमोर निदर्शने केली



या निदर्शनाच्या वेळी बोलताना संभाजी ब्रिगेडचे तालुका समन्वयक आनंद काशीद यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शाही फेक ही केवळ प्रवीण गायकवाड यांच्यावर नव्हती, तर ती संभाजी ब्रिगेडच्या विचारसरणीवर आणि महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीवरच हल्ला होता. ही कारवाई केवळ राजकीय स्वार्थातून किंवा वरिष्ट नेत्यांची खुशामत करण्यासाठी करण्यात आली आहे. मात्र, या प्रकाराचे जशास तसे उत्तर संभाजी ब्रिगेड देईल.

काशीद यांनी पुढे बोलताना सांगितले की, संभाजी ब्रिगेडने महाराष्ट्रात शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार घराघरात पोहोचवले आहेत. जाती-धर्माच्या नावावर फूट पाडणाऱ्यांवर आमचा नेहमीच विरोध राहिला आहे. आमची चळवळ सामाजिक समतेसाठी आहे. अशा हिंसक प्रकारांनी आम्ही नक्कीच गप्प बसणार नाही.

या निषेध आंदोलनात हनुमंत करंडे, विक्रम घाईतिडक, अभिजीत मोरे, अरुण घोडके, बंडू पिंगळे, विष्णू पवार यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तहसील कार्यालयासमोर घोषणाबाजी करत आणि हातात फलक घेऊन या कार्यकर्त्यांनी शांततामय मार्गाने आपला संताप व्यक्त केला. प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष गायकवाड यांच्यावरील जीवघेण्या हल्ल्याचा निषेध

**नांदेड (प्रतिनिधी)**

अक्कलकोट, जिल्हा सोलापुर येथे काही समाजकंटक, दंगेखोर व जातीय तेढ पसरविणाऱ्या प्रवृत्तींनी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अतिरेकी पद्धतीने शाई फेकुन व इतर हिंसक माध्यमातुन जीवघेणा हल्ला केला त्या हल्याचा सकल मराठा समाज नांदेड च्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला.संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांची उच्च विद्याविभुषीत अभ्यासु प्रदेशाध्यक्ष अशी ओळख आहे .संघटनेच्या माध्यमातुन वैचारिक प्रबोधनासह हजारो तरुणांना त्यांनी उद्योजक बनवले आहेत.सदर प्रकार केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर संपुर्ण विचारप्रवाहावर व राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर घातलेला आघात आहे.





हा हल्ला अत्यंत नियोजनबद्ध असुन, मागील काही काळात सामाजिक सलोखा बिघडविण्याच्या हेतुने अशा प्रकारचे हल्ले सातत्याने घडत आहेत.सदर हल्याचे व्हिडिओ फुटेच पाहता त्यांची प्रवृत्ती गुंडांची दिसते त्यामुळे यामध्ये सहभागी असलेल्या सर्व दोषी समाजकंटकांविरुद्ध तत्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच प्रकरणाचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदवुन राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेद्वारे सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच, राज्यातील सर्व विचारवंत, कार्यकर्ते व सामाजिक नेतृत्व यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी यंत्रणांना तातडीने निर्देश द्यावेत. हल्लेखोरांविरुद्ध जे कलम दाखल केलेत त्यात वाढ करुन आतंकवादविरोधी कायदा (ण-झ-) व समाजातील द्वेष पसरविणाऱ्या कायद्यांन्वयेही गुन्हे दाखल करून जास्तीत जास्त शिक्षा द्यावी संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांना शासनस्तरीय सुरक्षा कवच तातडीने उपलब्ध करून द्यावे.अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी राज्यस्तरावर तपास यंत्रणा स्थापन करून प्रतिबंधात्मक उपाययोजना आखाव्यात.सदर घटना ही फक्त व्यक्तिवर हल्ला नसून ती लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व संविधानिक मूल्यांवर हल्ला आहे.संभाजी ब्रिगेड ही एक वैचारिक तरुणांची आक्रमक संघटना आहे. दिपक काटे व त्याच्या सहकाऱ्यांवर ज्या कलमा लावल्यात त्यात वाढ करुन कठोर व पारदर्शक कारवाई करून लोकांचा विश्वास जपावा,अन्यथा देशभरात तीव्र पडसाद उमटतील जीवघेण्या हल्ल्याचा नांदेड सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देऊन निषेध व्यक्त करण्यात आला यावेळी माधव देवसरकर, अविनाश कदम,संकेत पाटील,दशरथ कपाटे, सुभाष कोल्हे,सतीष जाधव, सुनील कदम, प्रविण जाधव,शिवाजी पावडे,सदा पुयड, राज सरकार,परमेश्वर पाटील,अंकुश कोल्हे, कमलेश कदम,अशोक कदम, ज्ञानेश्वर हंगरगे,डॉ.विद्या पाटील, सुचिता जोगदंड, रत्नमाला जाधव,मिनाक्षी पाटील,कल्पना चव्हाण,सुनिता कल्याणकर,अर्चना होगे,श्रीनिवास शेजुळे,मोहन जाधव,भास्कर हंबर्डे,नवनाथ जोगदंड,माधव केरूरे,आवधुत कदम यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

# शिर्षस्थ नेतृत्वद्वयांचा वाढदिवस: समाजासाठी समर्पण परळीत ‘सेवा संकल्प सप्ताहा’ चा शानदार शुभारंभ

## आ.धनंजय मुंडे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे रहा-राजेश्वर आबा चव्हाण

## धनंजय मुंडेंनी मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला-संजय दौंड

## सामाजिक उपक्रमातून जनसेवेत समर्पण देवू-अजय मुंडे

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजितदादा पवार आणि परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ‘सेवा संकल्प सप्ताहा’चा उत्साहात शुभारंभ परळी येथे झाला. या सामाजिक उपक्रमाचा उद्देश विविध समाजोपयोगी कार्यांच्या माध्यमातून लोकसेवा करणे हा असून, उद्घाटन सोहळ्याला विविध राजकीय, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात मान्यवरांनी आमदार धनंजय मुंडे यांच्या कार्याची प्रशंसा केली. राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी सांगितले की, धनंजय मुंडे हे आपले खंबीर नेतृत्व आहे. सतत जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी आपलं नेतृत्व झटत असुन, आगामी निवडणुकांमध्ये सर्वांनी त्यांच्या पाठीशी उभे राहावे व बळ द्यावे असे आवाहन त्यांनी केले. माजी



आमदार संजय दौंड यांनी धनंजय मुंडे यांनी मतदारसंघाच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत आपण सर्वांनी या नेतृत्वाला जपले पाहिजे.असे नमूद केले. तर वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करणे ही प्रेरणादायी बाब आहे. साहेब आजही सामान्य जनतेसाठी तितक्याच जोमाने कार्यरत आहेत .सामान्य जनतेचे प्रश्न सोडवावेत यासाठी आपल्या सर्वांची साथ पाठीशी असणे महत्त्वाचे आहेअसे जि.प.गटनेते अजय मुंडे यांनी सांगितले.

या कार्यक्रमात केक कापून धनंजय मुंडे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. मृदंग स्पर्धा असल्यामुळे मृदंगाच्या वादनाने साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याचबरोबर, परळी शहरातील ’संकल्प स्पर्धा अकॅडमी’च्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तकांचा संच भेट देण्यात आला. तसेच, ’साई स्पर्धा अकॅडमी’, परळी वैजनाथ यांना शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर फिल्टर (ठज) भेट देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, बीड जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, तालुका अध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, परळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परळी विधानसभेचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, परळी शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे, तुळशीराम पवार, सुरेश अण्णा टाक, राजाभाऊ पौळ, राजेंद्र सोनी, जयपाल लाहोटी, प्राध्यापक डॉ. विनोद जगतकर, रवींद्र परदेशी, अनंतराव इंगळे, रामेश्वर महाराज कोकाटे, गोविंद महाराज मुंडे, ऍड. मनजीत सुगरे, जालिंदर नाईकवाडे, दत्ताभाऊ सावंत, महेंद्र रोडे, रवी मुळे,के.डी. उपाडे, ज्ञानेश्वर होळंबे आदी मान्यवर उपस्थित होते.

### समाजोपयोगी उपक्रमांची मालिका-बाजीराव धर्माधिकारी

**रा.कॉ. शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सेवा सप्ताहाचे प्रास्ताविक करताना सांगितले की,सेवा संकल्प सप्ताहा’च्या माध्यमातून लोकसेवा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.या सप्ताहात विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित केले आहेत. या सर्व उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.**

## शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस संपन्न

# महामानव अभिवादन ग्रुप संचलित मोफत शिकवणी वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात व परिसरात वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचणालंयच्या वतीने ३९ वाचनालेय सुरू करण्यात आले आहेत. सतत विद्यार्थ्यांशी संपर्क साधून विविध उपक्रम राबवण्यात येतात. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच वाचन संस्कृती वाढवण्याकरता विद्यार्थ्यांना वाचण्याकरता ५० ते १०० पुस्तकांचा संच प्रत्येक केंद्रात दिला जातो. गरजू व होतकरू गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून शालेय साहित्य ( पेन, वही, कंपास) देऊन, पे बॅक टू सोसायटी हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बहुमोल उपदेश लक्षात ठेवून समाज ऋण फेडण्याचे अल्पसे कार्य केल्या जाते. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून महामानव अभिवादन ग्रुप बीड संचलित मोफत शिकवणी वर्ग राजगृह बुद्ध विहार जुना मोंढा रोड बीड येथे वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी.वानखेडे यांनी त्याचं नातू तनय अनिल वानखेडे यांचा वाढदिवस जो की (आय.आय.एस.टी.इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस टेक्नॉलॉजी) तिरुवअनंतपुरम केरळ येथे शिकत आहे.

त्याचा वाढदिवस विद्यार्थ्यांसमवेत संपन्न करून २३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य



(वही पेन )व प्रधान प्रणव सोहम ससाने, यश जावळे, रुद्र धनवे, अनुष्का धनवे,प्राची नरवडे, नंदिनी धनवे, सिया घोडके, आशा आठ गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपदी एस.एस.सोनवणे लाभले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एल.आय.सी. यु.एस.वाघमारे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख ए. एल.अवसरमोल लाभले होते. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले,के येस. वाघमारे व संघमित्रा वाघमारे यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. आदर्शना विनम्र अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आठवले यांनी तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. प्रस्ताविकासत कॅप्टन आठवले म्हणाले की मोफत शिकवणी वर्गातील ३ ते ४ विद्यार्थी प्रशासकीय सेवेत गेले तर अभिवादन ग्रुपच्या कष्टाचे चीज झाले असे समजण्यात येईल या करिता अभिवादन ग्रुप सर्वतोपरी मदत करायला तयार आहे. प्रमुख पाहुणे मोफत शिकवणी वर्गाचे शिक्षक रविंद्र टेकाळे विध्यार्थीच्या प्रगती करीता घेत आसलेल्या कष्टा बददल मान्यावराच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यु.एस.वाघमारे, के.स.वाघमारे अत्यंत सोप्या भाषेत यांनी समजावून सांगून, बालकांनो तुम्ही भाग्यवान आहात की तुम्हाला मार्गदर्शन व मदत करण्याकरता २० व्या शतकातील ६ दशकात शिकलेले वयस्कर उपस्थित आहेत. आच्या वेळी आम्हाला मार्गदर्शन करायला कोणीही नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच शिक्षण प्राप्त करून स्वहिता बरोबरच आपल्या आई-वडिलांचे कष्ट कधीही न विसरता त्यांचे ऋण व समाजऋण फेडण्याचा विचार सतत डोळ्यासमोर ठेवावा. असे अनेक उदाहरणाद्वारे समजून सांगितले. आध्याक्षीय समारोपात सोनवणे एस.एस.म्हणाले की विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेत शिक्षणातून ज्ञान प्राप्त करावे त्याला शिलाची व वैज्ञानिक जोड देऊन पुढील जीवन जगण्यास तत्पर राहान्याचे ध्येय हे स्पष्ट केले. सर्वच उपस्थितानी तनय वानखेडे यांच्या वाढदिवसाबद्दल शुभेच्छा देऊन पुढील जीवनाकरता मंगल कामना व्यक्त केल्या. आभार प्रदर्शन डी.जी. वानखेडे यांनी व्यक्त करून प्रा डॉ. नामदेव सिनगारे प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड हे देखील आपल्या मुलींचे वाढदिवस अशाच पद्धतीने साजरे करत असे सांगितलं व त्यांचे आभार मानले. या कार्यक्रमला बहुसंख्य पालकांनी विद्यार्थी उपस्थित होते.

## आदर्श विद्यालय बीडच्या विद्यार्थ्यांची भरारी

# शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श विद्यालयातील ९ गुणवंत विद्यार्थ्यांनी मारली बाजी



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल तसेच गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली असून यात बीडच्या आदर्श विद्यालयातील तब्बल ९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटका स्थान पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

यामध्ये इयत्ता पाचवी मध्ये अनघा रामप्रसाद शेंडगे, श्रुती परमेश्वर वाघमोडे तसेच इयत्ता आठवी मध्ये वैष्णवी दादासाहेब गोरे, संस्कृती गणेश मिसाळ, कृष्णाली गणेश रीतापुरे, श्रावणी उद्धव करांडे, अमेय शैलेश अकुलवार, गौरव विकास गवते, भक्ती महेंद्र लांडे यांचा शिष्यवृत्ती धारक झाल्याबद्दल शाळेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकासमवेत शाल, पुष्पगुच्छ व आदर्श रत्न ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला... सदरील कार्यक्रमास उपशिक्षणाधिकारी मा. श्री मोहनजी काकडे साहेब, ज्येष्ठ शिक्षण विस्ताधिकारी मा.श्रीमती प्रणिता गंगाखेडकर मॅडम उपस्थित होते.सदरील प्रसंगी अनघा शेंडगे व गौरव गवते यांनी आपले मनोगते व्यक्त केली. शिष्यवृत्ती परीक्षा ही भावी सर्व स्पर्धा परीक्षांचा पाया म्हणून ओळखली जाते म्हणून सर्वांनी या परीक्षेचा जिद्दीने, चिकाटीने, मेहनतीने व आत्मविश्वासाने तयारी करावी. त्याचबरोबर संतुलित आहार घेऊन आपले आरोग्य चांगले ठेवावे. मोबाईल आणि टीव्हीपासून दूर राहावे असा मोलाचा सल्ला प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना दिला... सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती संध्या वाघमारे मॅडम यांनी केले.या यशाबद्दल ज्ञानेश्वर माऊली शिक्षण प्रसारक मंडळ बीड चे संस्थापक अध्यक्ष मा श्री अशोक अण्णा जाधव, सचिव सौ सविताताई जाधव, गणेश जाधव सर, शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता डोके, प्राचार्या दीप्ती देशमुख , शिक्षक वृंद,पालक तसेच मित्र परिवारा कडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.....

# जमीयतुल कुरैश समाजाची बैठक घेऊन मोठा निर्णय

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर शहरातील जमीयतुल कुरैश समाजाची बेपारी मोहल्ला झेंडीगेट येथे जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली या बैठकीत एकमुखाने सर्व समाज बांधवांच्या वतीने जनावरांची खरेदी विक्री चा व्यापार बंद करण्यात आले असल्याचा हा एक मोठा निर्णय घेण्यात आला या निर्णयाला सर्व समाज बांधवांनी स्वागत करत येणाऱ्या काळात जमीयतुल कुरैश समाजातील व्यक्ती जनावरांचा व्यापार करणार नसल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. अधिकृत परवानगी असणाऱ्या जनावर खरेदी विक्री करण्यासाठी नेत असताना देखील काही संघटनेच्या वतीने जमीयतुल कुरैश समाजाला जाणून-बुजून टार्गेट केले जात आहे व पोलीस प्रशासनाला चुकीची माहिती देऊन कोणताही पुरावा नसतांना खोटे गुन्हे दाखल करण्याचे काम करत असून कायद्याने मान्यता प्राप्त जनावर आणली तरी त्रास होत आहे व संपूर्ण जिल्ह्यात चालू असलेल्या गोहतेच्या नावा खाली चालु असलेली दहशत तथाकथित गोरक्षक यांच्याकडून जमीयतुल कुरैश समाजातील व्यक्तींनी व्यापारासाठी आणलेले जनावरे हे कतली साठी घेऊन जात असल्याचा खोटा आरोप करत पोलिसांच्या ताब्यात देऊन मारहाण करून पैसे काढून गुन्हे दाखल होऊन वाहने व आदी साहित्य जप्त होत असल्याने यामध्ये कुरेशी समाजाचा मोठा नुकसान होत आहे. त्यामूळे कुरेशी समाज हा जनावरांची खरेदी विक्रीचा व्यवसाय बेमुदत बंद केला.जनावरे खरेदी-विक्री करत असून शेतकरी व खाटीक यांची एक नाळ आहे जे शेतकऱ्यांचे भाकड जनावरे असतात जे दूध देत नाही काम करत नाही हे फक्त खाटीक शिवाय विकत कोणीच घेत नाही व कायद्याने मान्यता प्राप्त त्या जनावरांना हे पैसे देऊन जनावरे खरेदी करतात मात्र काही संघटनेचे लोक खाटीकांना मारहाण करून त्यांच्या पासून पैसे घेतात व रीतसर कागदपत्र असताना देखील अडवत आहे. त्यामुळे संपूर्ण खरेदी-विक्रीचा व्यवहार बंद करून लवकरच संपूर्ण जिल्ह्यात समाजाच्या वतीने शासनाला निवेदन देण्यात येणार असल्याचे देखील सांगण्यात आले बैठकीत संपूर्ण जिल्ह्यातील जमीयतुल कुरैश जमातचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# भूमाफियांचे काळे कारनामे आ.संदीप क्षीरसागरांनी सभागृहात उघड केले

## बीड शहरातील आरक्षित भूखंडावर प्लॉटींग करून अब्जावधींचा घोटाळा

**मुंबई । प्रतिनिधी**

नगरपालिका प्रशासन, नगर रचना विभाग आणि रजिस्ट्री कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून भ्रष्टाचार करत बीड मधील भूमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील प्लेग्राउंड असो की मंदिर अथवा गार्डन किंवा महिला स्वच्छतागृह या सगळ्यांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर प्लॉटिंग करून या भूमाफियांनी कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवत अब्जावधींचा घोटाळा केला आहे. यामध्ये सर्वसामान्य नागरिक आणि शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या भूमाफियांचे कारनामे पुराव्या सकट सभागृहात मांडले असून पुढील दोन महिन्यात याबाबत कारवाई करून संबंधित भूमाफिया यांच्यासोबतच अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन नगर विकास राज्यमंत्री यांनी दिले आहे.

बीड शहराचे नागरिकीकरण वाढल्यानंतर जालना रोड असो की नगर रोड अथवा बार्शी रोड या भागामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग निर्माण झाले आणि बंगले अपार्टमेंट रो हाऊस तयार करणारी एक भूमाफी यांची टोळी बीडमध्ये सक्रिय झाली. बीड शहरात प्लॉटिंग करताना काही मंडळींनी नगरपालिका प्रशासन नगर रचना विभाग आणि दस्त नोंदणी कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ओपन स्पेस विक्री करत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची चर्चा होती बीड शहरात भूमाफी यांनी जो काही नंगानाच केला आहे त्यामध्ये लहान मुलांच्या खेळण्यासाठी चे आरक्षित असलेले ग्राउंड असो किंवा गार्डन मंदिर सुलभ शौचालय यासाठी लेआउट मंजूर करताना जी जागा आरक्षित ठेवली आहे



तीच जागा सर्वसामान्य प्लॉट धारकांना विक्री करून भूमाफियांनी कोट्यावधी रुपये छापले असल्याचे चर्चा होती. यासंदर्भात मागील सहा सात महिन्यापासून पाठपुरावा करणारे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि१५) रोजी सभागृहात लक्षवेधी सूचनेद्वारे शासनाचे आणि संबंधित नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले. आमदार क्षीरसागर हे या विषयावर आक्रमक झाल्याचे सभागृहात दिसून आले.

बीड नगरपरिषद अंतर्गत सर्वे नंबर २९ तरफ माळी सर्वे नंबर १९४ तर बलगुजर सर्वे नंबर १९७ १९८ १९९ तरफ खोड सारडा रेसिडेन्सी व इतर, सर्वे नंबर ३४ ३५ ६८ ६९ ७९ तरफ गिराम, सर्वे नंबर १७३ तरफ बलगुजार, सर्वे नंबर ५३ सर्वे नंबर ५६ ५९ सर्वे नंबर १८८ तरफ पिंगळे, सर्वे नंबर १६ सर्वे नंबर १७ तरफ देशमुख सर्वे नंबर १५१ सर्वे नंबर १५२ तर बोबडे या सर्वे नंबर मध्ये भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात आरक्षित असलेले भूखंड विक्री केले आहेत किंवा चुकीचा लेआउट मंजूर करत भूखंड आरक्षित ठेवलेले नाहीत विशेष बाब म्हणजे प्लेग्राउंड आणि इतर गोष्टींसाठी आरक्षित केलेली जागा या ठिकाणी विक्री करून शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार आ.क्षीरसागर यांनी सभागृहात उघड केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077